Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

April -2019 Special Issue – 182 (B)

## Contemporary Innovation in Language & Literature

**Guest Editor:**
Dr. Nilesh N. Gawande
Principal,
Late B. S. Arts, Prof. N. G. Science &
A. G. Commerce College, Sakharkherda
Tq. Sindkhed Raja, Dist. Buldhana

**Executive Editor:**
Mr. Prakash S. Kolhe
Librarian,
Late B. S. Arts, Prof. N. G. Science &
A. G. Commerce College, Sakharkherda
Tq. Sindkhed Raja, Dist. Buldhana

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

**Local Organising Committee**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. R. P. Zanke | Dr. M. N. Gawande | Prof. S. V. Jaunjal | Dr. S. R. Dutonde |
| Prof. P. S. Kolhe | Prof. S. R. Gawai | Dr. P. R. Gaikwad | Prof. G. D. Kakade |
| Prof. P. P. Thakare | Prof. S. S. Gawai | Dr. R. P. Kitke | Prof. A. G. Barde |
| Dr. P. R. Mahalle | Prof. A.S. Ghayal | Dr. C. S. Khodre | Dr. R. V. Chaurpagar |
| Dr. N. P. Tale | Prof. P. S. Shimbre | Prof. S. R. Nagmote | Dr. V. R. Panse |
| | Prof. A. G. Kulkarni | Prof. R. V. Popalghat | |

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

**Published by –**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Scanned with CamSca

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 182 (B)- Contemporary Innovation in Language & Literature
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | सावरकरांचे भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनातील योगदान | डॉ.गणेश पवार | 07 |
| 2 | शालेय विद्यार्थ्यांच्या आहारात पोषण आहार योजनेची भूमिका एक अर्थशास्त्रीय विश्लेषण | डॉ.नीलम छगाणी | 09 |
| 3 | भारतीय स्वातंत्रलढ्यातील शेतकऱ्यांची आंदोलने | डॉ.निलय देशमुख | 13 |
| 4 | प्राचीन भारतीय युद्धनीती | डॉ.ओ.म.गजभिये | 17 |
| 5 | आधुनिक भारताच्या जडणघडणातील महिला एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | डॉ.प्रमोद चव्हाण | 23 |
| 6 | विदर्भाच्या इतिहासात चंद्रपूरचे राजकीय महात्म्य | डॉ.आर.पी.झनके | 26 |
| 7 | २१ व्या शतकात ग्रंथपालासमोरील आव्हाने | डॉ.साधना सातव | 28 |
| 8 | छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण | डॉ.एस,एन.तुरुकमाने | 31 |
| 9 | महाराष्ट्राची सांकृतिक स्फुर्तीस्थाने - किल्ले | डॉ.विलास देहनकर | 34 |
| 10 | स्थापत्याचा खजिना : बाल्लाळपुरचा किल्ला | डॉ.विपिन राठोड | 38 |
| 11 | आधुनिक कविता आणि केशवसुत | प्रा.गणेश काकडे | 40 |
| 12 | पक्षांतराचा भारतीय राजकारणावरील परिणाम | प्रा. लक्ष्मण शिराळे | 44 |
| 13 | जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि मराठी भाषा | मंदा नांदुरकर | 49 |
| 14 | पवनारची वैदर्भीय इतिहासातील मध्ययुगीन वाटचाल | सतिष इंगळे | 53 |
| 15 | लोकानुकंपाचा दोन दशकांचा वाङ्मयीन प्रवास (१९८६ ते २००७) | प्रा.मुकेश सरदार | 56 |
| 16 | महिला आणि भारतीय कायदे | प्रा.एन.आर.भिंगारे | 59 |
| 17 | बौद्धिक संपदा आणि भारतातील अधिकार | डॉ.प्रविण चंद्रगिरीवार | 62 |
| 18 | माता बाल आरोग्य व सामाजिक पोषण कार्यक्रम | प्रा.पल्लवी देशमुख | 66 |
| 19 | कुष्ठरोगी पुनर्वसनाच्या समस्येचे विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. पुरुषोत्तम बांडे | 70 |
| 20 | पश्चिम विदर्भ ग्रामीण क्षेत्र विकासातील आव्हाने | प्रा.अरुण घायाळ | 74 |
| 21 | गर्भावस्थेत महिलांनी घ्यावयाची काळजी | प्रा.मीनल गावंडे | 76 |
| 22 | जागतिकीकरण आणि मराठी कवितेतील उपहास-उपरोध | प्रा. सागर गवई | 80 |
| 23 | पर्यावरण संतुलनामध्ये अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषदांची उदासीनता | प्रा.संजय देशमुख | 83 |
| 24 | भारतातील प्रादेशिकतेची समस्या-एक चिंतन | प्रा.लक्ष्मण शिराळे | 86 |
| 25 | २०१० नंतर झालेल्या निवडणूक सुधारणा | प्रा.विलास टाले | 91 |
| 26 | त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर | प्रा.विनय तायडे | 96 |
| 27 | प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे मेळघाटच्या विकासात योगदान | प्रा.अंकुश तुरखडे | 99 |
| 28 | भारतीय लोकसभेचे कामकाजाचे नियम व स्वरूप | प्रा.अतुल नारायण खोटे | 103 |
| 29 | वारकरी साहित्याची मीमांमा | गणेश सावजी | 108 |
| 30 | आदिवासी लोकगीतातून व्यक्त होणारी स्त्री जीवन | प्रा.रेखा आढाव | 113 |
| 31 | नाथ परंपरेची थोरवी | डॉ.श्रीहरी पितळे | 118 |
| 32 | वाचनकला - उणिवांचा शोध व उपाययोजना | सौ.विजयश्री सावजी | 121 |
| 33 | संत एकनाथ व भारुड | प्रा.शशिकांत काळे | 127 |
| 34 | फुले आंबेडकर क्रांतीतील मर्वममावेशकता | प्रा. संतोष जाधव | 131 |
| 35 | बचत गटांची महिला सक्षमीकरणात क्रांतीकारी भूमिका | तृप्ती महाजन | 139 |




Scanned with CamSca

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182 (B)- Contemporary Innovation in Language & Literature | April-2019
UGC Approved Journal

# लोकानुकम्पाचा दोन दशकांचा वाङमयीन प्रवास (१९८६ ते २००७)

**प्रा. मुकेश भाऊराव सरदार**
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
चिखलदरा. जि. अमरावती

गेली २१ वर्ष डॉ. योगेन्द्र मेश्राम यांनी लोकानुकम्पा या नियतकालीकाची धुरा लिलयापणे सांभाळली. मूल जन्माला घालणं सोप असतं पण मुलाचं संगोपण करणं, त्याला वाढवणं मोठं जिकिरीचं काम असतं. डॉ. योगेन्द्र मेश्राम त्यांच्या या कामात यशस्वी झाले आहेत. आणि त्यासाठी ते आणि त्यांच अपत्य लोकानुकम्पा या दोघांचंही कार्य अत्यंत प्रेरणादायी असे राहिलेले आहे.

वाङमयीन नियतकालिक चालवणं हे खरोखरच मोठ्या कष्टाचं काम आहे. इतक कष्टाचं की लेखन नको, लेखक आवर अशी संपादकाची स्थिती होत असते. लेखकांना सांभाळणं आणि एखाद्या प्रियसीच्या नाकदुऱ्या काढणं सारखचं प्रेयसीला जसा प्रियकर दुखवू इच्छित नाही, तसा संपादक लेखकाला लेखक हा प्राणी फार नाजुक असतो. त्याला तुझी कविता आवडली नाही. किंवा तुझी कथा जरा ... तरी लेखक-कवी-कथाकार त्या संपादकाच्या अकलेवरच वार करतो. आणि नियतकालिक गंभीर प्रवृत्तीचं असेल, लोकानुकम्पा सारखं, त्यातही आंबेडकरवाद हा नवा युगधम्म मानणारं आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञान आणि विश्वात्मकता उरी घेवून जगणारं तर? कुठल्याही गंभीर नियतकालीकाचा संपादक चौफेर व्यासंगी हवाच असतो. वर्तमान समजून घेत भविष्यकालिन प्रश्नाची जाण असणारा हवा असतो. तत्वज्ञ आणि चिंतक देखील. त्या दृष्टीने गेली २१ वर्षे लोकानुकम्पाचं कार्य दिसतं ते असे :- १) डॉ. आंबेडकर विशेषांक, २) बुध्दधम्मचक्र प्रवर्तन विशेषांक, ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी विशेषांक, ४) म. फुले-सावित्रीबाई फुले विशेषांक, ५) प्रेरणा विशेषांक, ६) कथा-आत्मकथा विशेषांक, ७) शंकरराव खरात, दया पवार विशेषांक हे महत्वाचे ठळक विशेषांक आणि त्यातून डॉ. भालचंद्र फडके, शंकरराव खरात, प्र. श्री नेरुरकर डॉ.निर्मलकुमार फडफुले, दया पवार, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अमिताभ, केशव मेश्राम, डॉ. गंगाधर पानतावणे, सुरेश भट या बिभीच्या लेखकाबरोबरच अगदी नवे नव्या पिढीचे दमदार असे दादाकांत धनविजय, धर्मराज निमसरकर, अरविंद सुरवाडे, वैभव सोनारकर, डॉ. प्रकाश खरात, ताराचंद्र खांडेकर, डॉ. सुशिला ढगे, अॅड-एकनाथ साळवे, डॉ. ज्योती लांजेवार, डॉ. श्रीपाल सबनीस ... अशी कितीतरी अनेक नाव आणि डॉ. योगेन्द्र मेश्राम त्यांनी संकल्पिलेल्या दिशेनं नीटसपणे पुढे चालले आहेत. "डॉ. योगेन्द्र मेश्राम ह्या मनस्वी लेखकाने आणि संपादकाने अतीव निष्ठेने हा वाङ:मयीन प्रपंच आरंभलेला आहे. आमची नियतकालिके आमची सांस्कृतिक ठेव आहे. "१ अत्यंत प्रतिकुलतेत अनेक आव्हाने झेलत, उपहास आणि अत्यंत प्रतिकुलतेत अनेक आव्हाने झेलत, उपहास आणि अधिक्षेप वाट्याला येऊनही वादळातील दीपस्तंभाप्रमाणे लोकानुकम्पा तेवत आहे. लोकानुकम्पा कुणाशी स्पर्धा करण्यासाठी किंवा द्वेष करण्यासाठी उदयाला आले नाही. परंतु आंबेडकर विचारांना अग्नी प्रज्वलित करण्यासाठी जे प्रतिज्ञा करतात, संकटांना तोंड देत व तुर्डवित वाट चालत राहतात. "नैराश्याचे डोंगर चढावे-उतरावे लागतात. मात्र ध्येयवादावर कधीही काजळी बसू देत नाहीत. लोकानुकम्पा अशा नियतकालिकापैकी एक आहे. उदंड आत्मविश्वास हिच त्याची मिळकत आहे. एक वाङ:मयीन व सांस्कृतिक विराटशक्ती उभी करणं. ही आमच्या नियतकालिकाची प्रकृती आहे."२ ह्या शक्तीनं मराठीतील मक्तेदारीला जबरदस्त हादरा दिला आहे.

डॉ.योगेंद्र मेश्राम यांची संपादकी इतर पत्रांच्या संपादकी प्रमाणे पैसे कमविण्याचा धंदा नसून हे लोकजागृतीची घेतलेली त्यांनी स्वयंदीक्षा वृत्तपत्राचा प्रपंच हा सामाजिक ऋण फेडण्यासाठी आहे. हा बाबासाहेबांचा विचार डॉ.योगेंद्र मेश्राम यांनी ध्येयवाद म्हणून तो स्विकारला.लोकानुकम्पा आंबेडकरी ध्येयवाद उरी पोटी घेऊन जोपासणारे एक लोकाभिमुख असे महत्वाचे नियतकालीक आहे. यात शंका नाही.

Scanned with CamSc

लोकानुकम्पाचा प्रत्येक अंकच अत्यंत मेहनतीनं साकारलेला आहे. लोकानुकम्पाच्या माध्यमातून वेगवेगळे अनुभव प्रकाशोत झालेत्यामुळेच लोकानुकम्पाच्या प्रत्येक अंकाला संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे. गेल्या २१ वर्षात लोकानुकम्पानें फुले-आंबेडकरी तत्वे जनमाणसात पेरण्याचे काम केले. "लोकानुकम्पातील विचारधन विद्रोहाकडुन विवेकशिलतेकडे जाणारे आहे. त्यामुळे इतर नियतकालीकांच्या तुलनेत हेच मला लोकानुकम्पाचे महत्वाचे वेगळेपण वाटते. मनुष्यत्वाच्या आशयावर, त्यांच्या तळहातावर लोकानुकंम्पा विराजमान झाले आहे".३

लोकानुकम्पामधील संपादकीय मध्ये डॉ. योगेन्द्र मेश्राम म्हणतात "सनदशीर मार्गाने आणि नाहीतर न जुमानणाऱ्या सत्ताधुंदीचाहासारा अन्यायमुल आंधळा खेळ खलास करण्यासाठीक्रांतीचाच अंतीम मार्ग स्विकारणे आता अटळ आहे".४ ही क्रांती करण्यासाठी लोकानुकम्पाची भुमिका महत्वाची रहाणार यात शंका नाही. याची जाणीव त्यांना होती. थोडक्यात लोकानुकम्पा ही क्रांतीसाठी सुपीक जमीन आहे. त्याचा प्रत्येकाने वापर करावा, त्याचे वाचन करावे. इतके यातील विचार अंतर्मुख करणारे आहेत.

**समकालीन नियतकालिके आणि लोकानुकम्पा : वैशिष्ट्ये**

"लोकानुकम्पा हेच नाव डॉ. मेश्रामांनी आपल्या नियतकालिकाचे का ठेवले ? शेक्सपिअर म्हणाला खरं, नावात काय आहे ? पण नावातच सारंसार आहे. लोकानुकम्पा म्हणजे लोकांविषयी अनुकंपा-अनुकम्पा म्हणजे मैत्री-दया-प्रेमभावना-करुणा. लोकानुकम्पा म्हणजे बुद्धाची करुणा. आकाशाऐवढा मोठा अर्थ आहे. या नावात लोकानुकम्पा म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी दाखवलेली आस्था होय. "५

**समकालीन नियतकालिके :-**

लोकानुकम्पा, समुचित, आम्ही मैतरणी, निकाय, धम्म-राज-प्रवाह, प्रबुद्ध भारत, दीक्षाभूमी, संदेश, बहुजन संघर्ष, समतेसाठी बहुजन संघर्ष, अस्मितादर्श, रविदास सत्यशोधक, पुरोगामी सत्यशोधक, जागृतीज्वाला, बुद्धयान हे आंबेडकरी चळवळीचे नियतकालीकांनी अत्यंत महत्वपूर्ण काम केले व अजूनही काही नियतकालिके करीत आहेत. आंबेडकरी चळवळीला मोठे योगदान देत आहेत. हे प्रामुख्याने नोंदवावे लागेल.

आंबेडकरी नियतकालिके ही सामजिक संस्काराचा प्रभाव वाचकांवर टाकतात. त्यामुळे समाजमनावर अप्रत्यक्षपणे परिणाम होतो. आंबेडकरी नियतकालिकांच्या वाचनात सामाजिकता ही अपरिहार्यपणे अंतर्भूत असते. डॉ. विनोद वासुदेव उपर्वट म्हणतात की, "केवळ वाङ:मयीन भूकिमकेने नियतकालिके तग धरुन राहत नाहीत असाही सूर अलिकडे निघत आहे. म्हणून यातील वास्तवाचे चित्रण या सामाजिकतेशी प्रगतपर सामाजिक मूल्यांशी सुसंगत असणे आवश्यक आहे."६ वाचकांची अभिरुची आणि सामाजिकता परस्परांना छेद देणारी नसून पूरक असली पाहीजे. आणि हे कार्य आंबेडकरी चळवळीतील नियतकालीके करु शकतात. अत्यंत मिळमिळीत, गुळगुळीत, चटपटीत, खमंग, रंगीत, भेदरलेल्या भांबावलेल्या धास्तावलेल्या एकमेकांचा अनुनय करण्यात गुंतलेल्या व त्यायोगे कसेही करुन छोट्या मोठ्या लाभांच्या बाबी पदरात पाडून घेऊ इच्छिणाऱ्या संस्कृतीचा लेखक कलावंत देखील एक घटक झालेला आहे. त्यामुळे वाचकांचा प्रभाव आंबेडकरी नियतकालिकांवर तसा झालेला आहे. कला, सर्जन, कलाव्यवहार आणि त्यांचे तात्विक चिंतन यांचा व्यक्ती व समाजाशी संबंध प्रत्यक्ष जाणवत नसला तरी या बाबी व्यक्तीच्या व समाजाला वैश्विक, सैद्धांतिक, नैतिक असा जीवनविषयक, मूल्यविषयक पाया रचणाऱ्या बाबी असून व्यक्ती व समाजाची सांस्कृतिकता व तिचा दर्जा त्यातूनच निर्माण होत असतो, कायम टिकू शकतो. दुर्देवाने या समकालीन वास्तवात समाज वावरत असल्याचे चित्र आज अनेक नियतकालिकांनी साकारलेले आहे.

**लोकानुकम्पाचे वेगळेपण :-**

आंबेडकरी नियतकालिकांमध्ये लोकानुकम्पाचा महत्त्वाचा वाटा आहे. आंबेडकरवादी चळवळीमागील तात्विक वैचारीक मूल्य प्रसृत करुन ती समाजमनात रुजविण्याचा विगत २१ वर्षापासून या नियतकालिकाने प्रयत्न केला आहे. लोकानुकम्पातील सर्वच लेखांतून व्यक्त झालेली विचारगर्भ आत्मियता एखाद्या सनदेसारखीच वाटते.



Scanned with CamSc

वाङ्‌मयाच्या इतिहास लेखनासाठी लोकानुकम्पांचे महत्त्व अनन्य साधारण असेच आहे. "डॉ.योगेन्द्र मेश्रामांच्या या कार्याची नोंद दलितसाहित्य चळवळीच्या इतिहासात नक्कीच होईल. असे फ. मु. शिंदे व डॉ.गंगाधर पानतावणे म्हणतात."७

एखादे नियतकालिक चालविणे म्हणजे तारेवरची कसरत असते. या कसरतीला घाबरुनच अनेक चांगले चांगले अंक बंद पडलेत पण अस्मितादर्श नंतर सातत्याने निघणारे लोकानुकम्पा हे नियतकालिक आहे. आमचा नागनगरीचे ते एकसाहित्यिक-सांस्कृतिक, मौलिक धन आहे. वैभव आहे.

ला संपादक "डॉ. योगेन्द्र मेश्राम म्हणाले लोकानुकम्पा हे आंबेडकरी समाज प्रबोधनाच्या चळवळीचे प्रभावी माध्यम आणि एक मूलभूत महत्वाचे साधन असून मागील २१ वर्षापासून जनजागरणाचे कार्य अव्याहतपणे केले आहे. व करीत आहे."८ योगेन्द्र मेश्राम यांच्या लोकानुकम्पा या नियतकालिकाने अनेक लेखकांना लिहिते केले आणि समाज जागरणाचे काम जिवंत ठेवले. डॉ. स. दा. कऱ्हाडे; विलास राशीनकर ताराचंद्र खांडेकर या सारख्या लेखकांनी लोकानुकम्पाची पार्श्वभूमी भक्कम केलेली दिसते. कुठलीही वाङमयीन कलाकृती ही कलावंतामुळेच शोभुन दिसत असते. लोकानुकंम्पा या नियतकालिकात अस्सल कलावंतानी, लेखकांनी लेखन केल्यामुळे या नियतकालिकाचे महत्त्व ऐतिहासिक आहे. असेच म्हणावे लागेल.

१. लोकानुकम्पा जा-फे-मा-२००५ पृष्ठ क्र. १६. संपादक डॉ. योगेन्द्र मेश्राम, नागपूर.
२. लोकानुकम्पा जा-फे-मा- २००६ पृष्ठ क्र.३२. संपादक डॉ. योगेन्द्र मेश्राम, नागपूर.
३. लोकानुकम्पा ए-मे-जू-२०००, संपादक डॉ. योगेन्द्र मेश्राम, नागपूर.
४. तैत्रेय पृ.५०.
५. लोकानुकम्पा जा-फे-मा-२००५ पृष्ठ क्र.१७. संपादक डॉ. योगेन्द्र मेश्राम, नागपूर.
६. आंबेडकरी चळवळीतील नियतकालिके (पृ.१४०) लेखक- प्रा. डॉ. विनोद वासुदेव उपर्वट प्रकाशक- डॉ.अनिल मा. वैसाणे प्रथमावृत्ती -२०१४.
७. लोकानुकम्पा आ-नो-डि २००४ पृ. २९, संपादक डॉ. योगेन्द्र मेश्राम, नागपूर.
८. लोकानुकम्पा आ-नो-डि २००४ पृ. २४, संपादक डॉ. योगेन्द्र मेश्राम, नागपूर.

Scanned with CamSc